ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २९ पुणें, बुधवार तारीख ३ एप्रिल, १९६३ अंक ७

## विविध माहिती

**सिकिमच्या महाराजकुमारांचा विवाह** — सिकिमचे महाराजकुमार ह्यांनीं कु. होप कुक ह्या अमेरिकन तरुणीशीं विवाहबद्ध होण्याचें ठरविलें. २० मार्च रोजीं विवाह समारंभ साजरा झाला. समारंभाला अमेरिकेचें भारतामधील वकील प्रो. गालब्रेथ हजर होते. अमेरिकेशिवाय आणखी १२ परदेशांचे प्रतिनिधीहि हजर होते. महाराजकुमारांचें वय ४० असून कु. होप कुक २० वर्षांच्या आहेत. समारंभाला जाणाऱ्या पाहुण्यांसाठीं ६ लष्करी हेलिकॉप्टर्सची सोय करण्यांत आली होती.

**मागासलेपणाची कसोटी**—पंजाब सरकारनें जातीवरून अगर जमातीवरून मागासलेपणा ठरविण्याची कसोटी रद्द केली आहे. नव्या कसोटीप्रमाणें ज्यांचें वार्षिक उत्पन्न १,००० रुपयांपर्यंत असेल ते सर्व मागासले समजले जातील व त्यांना राज्य सरकारकडून मिळणाऱ्या सर्व सवलती मिळतील. ह्या कसोटीमुळें ब्राह्मणादि जातींच्या लोकांचेंहि उत्पन्नावरून नवें वर्गीकरण करण्यांत येईल.

**ब्रह्मदेशांतील परदेशीय धंदेवाले**—रंगूनमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या एका इंग्रजी दैनिकांत ब्रह्मदेशांत उद्योगव्यवसाय करणारे परदेशीय नागरिक चालू वर्षाच्या प्रारंभापासून आपआपल्या देशांत परत जात आहेत अशी वार्ता प्रसिद्ध झाली आहे. ब्रह्मदेशाच्या सरकारचें व्यापार व उद्योगधंदे ताब्यांत घेण्याचें धोरण असल्यामुळें, परदेशीय नागरिकांना आतां वावच राहिला नाहीं असें मत त्या दैनिकानें व्यक्त केलें आहे.

**सिगारेटस् विरोधी मोहीम** – अमेरिकेंत न्यूयॉर्क राज्याच्या विधिमंडळांतील एका सभासदानें सिगारेटला विरोध करणारें एक बिल मांडण्याचें ठरविलें आहे. सदर बिलाप्रमाणें राज्यांतील सिगारेटच्या पेट्यांवर सध्यांपेक्षा २ सेंटस् अधिक कर बसविण्यांत यावयाचा आहे. ह्या करामुळें जमणारें उत्पन्न १० लाख डॉलर्स-इतकें जमलें कीं त्याचा उपयोग कॅन्सरच्या संशोधनासाठीं करण्यांत यावयाचा आहे. बिल मांडणारा सभासद् कांहीं वर्षांपूर्वीं कॅन्सरनें आजारी होता. पण त्यांतून तो बचावलेला आहे.

**गुन्ह्यांबद्दल शिक्षा भोगण्याची इच्छा** — न्यूयॉर्कमधील सिंगसिंग तुरुंगांतील एका खुनी गुन्हेगाराला ५ खून करण्याबद्दल विजेच्या खुर्चीच्या साह्यानें देहांताची शिक्षा देण्यांत आली होती. गुन्हेगाराच्या वकिलानें शिक्षेविरुद्ध मनाई हुकूम मिळविण्यासाठीं त्याच्या इच्छेविरुद्ध कोर्टांत अर्ज दाखल केला आहे. खुद्द गुन्हेगार मात्र गुन्ह्यांचें प्रायश्चित म्हणून मृत्यूस कवटाळण्यास तयार आहे. गुन्हेगाराची मानसिक तपासणी करावी असा अर्ज वकिलानें कोर्टाकडे केला आहे.

**तेलाच्या शोधासाठीं यंत्रसामग्री**—तेल आणि नैसर्गिक वायुमंडळ आणि रशिआ ह्यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणें रशिया भारताला खनिज तेलाच्या संशोधनासाठीं उपयोगी पडणारी विविध प्रकारची यंत्रसामग्री देणार आहे. यंत्रसामग्रीची किंमत सुमारें ४ कोटी रुपयांची असून ती १॥ वर्षांच्या अवधींत भारतांत पोंचविली जाईल.

**बांगड्यांसाठीं लागणारें द्रव सोनें**—कांहीं प्रकारच्या बांगड्या तयार करतांना द्रव सोन्याचा वापर करावा लागतो. सुवर्णनियंत्रणाच्या नियमांची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून बांगड्यांच्या धंद्यावर त्यांचा परिणाम झाला आहे. द्रव सोन्याच्या ऐवजीं एक रसायन वापरण्याचे प्रयोग सुरू असून हे प्रयोग बरेच यशस्वी झाल्याची वार्ता आहे.

**मोहनिद्रेचा वैद्यकीय उपयोग**—अमेरिकेंत रोगनिवारणासाठीं मोहनिद्रेच्या तंत्राचा उपयोग वाढत्या प्रमाणावर करण्यांत येऊं लागला आहे. सुमारें २,००० अमेरिकन डॉक्टर्स आपल्या व्यवसायांत मोहनिद्रेचा उपयोग करीत असून अशा डॉक्टर्सची संख्या वाढत चाललेली आहे. मात्र ह्या विद्येचा उपयोग वैद्यकीय तज्ज्ञांनींच करावा असा इशारा एका प्रख्यात डॉक्टरनें दिला आहे.

**ब्रिटनकडून कर्जाची मदत** — भारतावर चीननें केलेल्या आक्रमणामुळें औद्योगिक विकासाची निकड आणखी तीव्र झालेली आहे. भारताची आणीबाणीची गरज लक्षांत घेऊन ब्रिटननें भारताला ३ कोटी पौंड कर्ज मंजूर केलें आहे. ह्याबाबतच्या करारावर लवकरच सह्या होणार असून कर्जाचा उपयोग करून ब्रिटनकडून संरक्षणविषयक माल व यंत्रसामग्री आयात करण्यांत येईल.

**जुन्या पोस्टाच्या तिकिटाची किंमत** — मॉरिशसमधील पोस्टाचें १८४७ सालीं काढण्यांत आलेलें एक जुनें तिकिट लंडनमध्यें ८,५०० पौंडाला विकण्यांत आले. जपानमधील एका कापडगिरणी कारखानदारानें तें विकत घेतलें. त्या सालांतील दोनच तिकिटें उपलब्ध असून तीं दोन्हींहि न वापरलेलीं आहेत. १९५७ सालीं ह्या तिकिटांचा लिलांव ४,५०० पौंडांपुढें गेला नव्हता.

**इलमेनाइट वाळूची निर्यात** — अणुविज्ञानांत महत्त्व पावलेली इलमेनाइटमिश्रित वाळू केरळ राज्यांतून परदेशांत निर्यात होत असे. पण अलीकडे ह्या वाळूची परदेशांतील मागणी बंद अगर कमी झालेली आहे. आतां ह्या वाळूचे नमुने झेकोस्लोव्हाकिआला पाठविण्यांत आलेले आहेत. नमुने पसंत पडल्यास इलमेनाइटची वाळू त्या देशाला निर्यात करण्यांत येईल.

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख ३ एप्रिल, १९६३ | अंक ७

## विविध माहिती

**सिकिमच्या महाराजकुमारांचा विवाह** — सिकिमचे महाराजकुमार ह्यांनीं कु. होप कुक ह्या अमेरिकन तरुणीशीं विवाह-बद्ध होण्याचें ठरविलें. २० मार्च रोजीं विवाह समारंभ साजरा झाला. समारंभाला अमेरिकेचें भारतामधील वकील प्रो. गालब्रेथ हजर होते. अमेरिकेशिवाय आणखी १२ परदेशांचे प्रतिनिधीहि हजर होते. महाराजकुमारांचें वय ४० असून कु. होप कुक २० वर्षांच्या आहेत. समारंभाला जाणाऱ्या पाहुण्यांसाठीं ६ लष्करी हेलिकॉप्टर्सची सोय करण्यांत आली होती.

**मागासलेपणाची कसोटी**—पंजाब सरकारनें जातीवरून अगर जमातीवरून मागासलेपणा ठरविण्याची कसोटी रद्द केली आहे. नव्या कसोटीप्रमाणें ज्यांचें वार्षिक उत्पन्न १,००० रुपयांपर्यंत असेल ते सर्व मागासले समजले जातील व त्यांना राज्य सरकारकडून मिळणाऱ्या सर्व सवलती मिळतील. ह्या कसोटीमुळें ब्राह्मणादि जातींच्या लोकांचेंहि उत्पन्नावरून नवें वर्गीकरण करण्यांत येईल.

**ब्रह्मदेशांतील परदेशीय धंदेवाले**—रंगूनमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या एका इंग्रजी दैनिकांत ब्रह्मदेशांत उद्योगव्यवसाय करणारे परदेशीय नागरिक चालू वर्षाच्या प्रारंभापासून आपआपल्या देशांत परत जात आहेत अशी वार्ता प्रसिद्ध झाली आहे. ब्रह्मदेशाच्या सरकारचें व्यापार व उद्योगधंदे ताब्यांत घेण्याचें धोरण असल्यामुळें, परदेशीय नागरिकांना आतां वावच राहिला नाहीं असें मत त्या दैनिकानें व्यक्त केलें आहे.

**सिगारेटस् विरोधी मोहीम** – अमेरिकेंत न्यूयॉर्क राज्याच्या विधिमंडळांतील एका सभासदानें सिगारेटला विरोध करणारें एक बिल मांडण्याचें ठरविलें आहे. सदर बिलाप्रमाणें राज्यांतील सिगारेटच्या पेट्यांवर सध्यांपेक्षा २ सेंटस् अधिक कर बसविण्यांत यावयाचा आहे. ह्या करामुळें जमणारें उत्पन्न १० लाख डॉलर्स-इतकें जमलें कीं त्याचा उपयोग कॅन्सरच्या संशोधनासाठीं करण्यांत यावयाचा आहे. बिल मांडणारा सभासद कांहीं वर्षांपूर्वी कॅन्सरनें आजारी होता. पण त्यांतून तो बचावलेला आहे.

**गुन्ह्यांबद्दल शिक्षा भोगण्याची इच्छा** — न्यूयॉर्कमधील सिंगसिंग तुरुंगांतील एका खुनी गुन्हेगाराला ५ खून करण्याबद्दल विजेच्या खुर्चीच्या साह्यानें देहांताची शिक्षा देण्यांत आली होती. गुन्हेगाराच्या वकिलानें शिक्षेविरुद्ध मनाई हुकूम मिळविण्यासाठीं त्याच्या इच्छेविरुद्ध कोर्टांत अर्ज दाखल केला आहे. खुद्द गुन्हेगार मात्र गुन्ह्यांचें प्रायश्चित म्हणून मृत्यूस कवटाळण्यास तयार आहे. गुन्हेगाराची मानसिक तपासणी करावी असा अर्ज वकिलानें कोर्टाकडे केला आहे.

**तेलाच्या शोधासाठीं यंत्रसामग्री**—तेल आणि नैसर्गिक वायुमंडळ आणि रशिआ ह्यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणें रशिया भारताला खनिज तेलाच्या संशोधनासाठी उपयोगी पडणारी विविध प्रकारची यंत्रसामग्री देणार आहे. यंत्रसामग्रीची किंमत सुमारें ४ कोटी रुपयांची असून ती १॥ वर्षांच्या अवधींत भारतांत पोंचविली जाईल.

**बांगड्यांसाठीं लागणारें द्रव सोनें**—कांहीं प्रकारच्या बांगड्या तयार करतांना द्रव सोन्याचा वापर करावा लागतो. सुवर्णनियंत्रणाच्या नियमांची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून बांगड्यांच्या धंद्यावर त्यांचा परिणाम झाला आहे. द्रव सोन्याच्या ऐवजीं एक रसायन वापरण्याचे प्रयोग सुरू असून हे प्रयोग बरेच यशस्वी झाल्याची वार्ता आहे.

**मोहनिद्रेचा वैद्यकीय उपयोग**—अमेरिकेंत रोगनिवारणा-साठी मोहनिद्रेच्या तंत्राचा उपयोग वाढत्या प्रमाणावर करण्यांत येऊं लागला आहे. सुमारें २,००० अमेरिकन डॉक्टर्स आपल्या व्यवसायांत मोहनिद्रेचा उपयोग करीत असून अशा डॉक्टर्सची संख्या वाढत चाललेली आहे. मात्र ह्या विद्येचा उपयोग वैद्यकीय तज्ज्ञांनींच करावा असा इषारा एका प्रख्यात डॉक्टरनें दिला आहे.

**ब्रिटनकडून कर्जाची मदत** — भारतावर चीननें केलेल्या आक्रमणामुळें औद्योगिक विकासाची निकड आणखी तीव्र झालेली आहे. भारताची आणीबाणीची गरज लक्षांत घेऊन ब्रिटननें भारताला ३ कोटी पौंड कर्ज मंजूर केलें आहे. ह्याबाबतच्या करारावर लवकरच सह्या होणार असून कर्जाचा उपयोग करून ब्रिटनकडून संरक्षणविषयक माल व यंत्रसामग्री आयात करण्यांत येईल.

**जुन्या पोस्टाच्या तिकिटाची किंमत** — मॉरिशिसमधील पोस्टाचें १८४७ सालीं काढण्यांत आलेलें एक जुनें तिकिट लंडनमध्यें ८,५०० पौंडाला विकण्यांत आलें. जपानमधील एका कापडगिरणी कारखानदारानें तें विकत घेतलें. त्या सालांतील दोनच तिकिटें उपलब्ध असून तीं दोन्हींहि न वापरलेलीं आहेत. १९५७ सालीं ह्या तिकिटांचा लिलांव ४,५०० पौंडांपुढें गेला नव्हता.

**इलमेनाइट वाळूची निर्यात** — अणुविज्ञानांत महत्त्व पाव-लेली इलमेनाइटमिश्रित वाळू केरळ राज्यांतून परदेशांत निर्यात होत असे. पण अलीकडे ह्या वाळूची परदेशांतील मागणी बंद अगर कमी झालेली आहे. आतां ह्या वाळूचे नमुने झेकोस्लोव्हाकिआला पाठविण्यांत आलेले आहेत. नमुने पसंत पडल्यास इलमेनाइटची वाळू त्या देशाला निर्यात करण्यांत येईल.

### शाळांतील शास्त्रीय विषयांचे शिक्षक

माध्यमिक शाळांतून शास्त्रीय विषय शिकविणाऱ्या शिक्षकांची टंचाई भासूं लागली आहे. म्हणून असे शिक्षक शिकवून तयार करण्यासाठी अजमीर, भुवनेश्वर, भोपाळ व म्हैसूर ह्या चार ठिकाणीं ट्रेनिंग कॉलेजें काढण्यांत येणार आहेत. कॉलेजमधील अभ्यासक्रम ४ वर्षांचा असेल व त्यांतील एक वर्ष प्रयोगविषयक प्रत्यक्ष कामाचें राहील. शास्त्रीय विषय घेऊन शालांत परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांना कॉलेजांत प्रवेश मिळेल. दरवर्षी १२० विद्यार्थी प्रत्येक कॉलेजांतून घेण्यांत येतील. प्रत्येक विद्यार्थ्याला मासिक १०० रुपये भत्ता देण्यांत येईल. पदवी मिळविल्यानंतर २ वर्षें त्याला शिक्षकाचें काम करावें लागेल. कॉलेजें चालविण्याचा खर्च संयुक्त राष्ट्र संघटनेची शास्त्रीय व सांस्कृतिक उपसंघटना करणार आहे.

### मॉस्कोंत माहिती पुरविणारी कचेरी

गेल्या वर्षअखेर चीननें भारतावर केलेल्या आक्रमणाचे वेळीं परदेशांतून भारताच्या उत्तर सरहद्दीवरील घडामोडींची माहिती भारतातर्फे नीटशी देण्यांत आली नाहीं असें आढळून आलें. आतां भारत सरकारनें मॉस्कोमध्यें हिंदमधील वृत्त देणारी एक कचेरी उघडण्याचें ठरविलें आहे. रशियाप्रमाणेंच इतर कांहीं देशांतूनहि अशा कचेऱ्या उघडण्यांत येणार आहेत.

### माझगांव येथील गोदीचा विस्तार

मुंबईमधील माझगांव गोदीचा विस्तार करून तींत बोटी बांधण्याच्या व त्या दुरुस्त करण्याच्या अधिक चांगल्या सोयी करण्याची योजना आंखण्यांत आली असून ती भारत सरकारनें मान्य केली आहे. विस्ताराचें काम पूर्ण झाल्यावर ह्या गोदींत युद्धनौका बांधता येतील. ह्या कामासाठी सुमारें ३·५ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

### गुजरातमधील नव्या कंपन्या

१९६१-६२ सालांत गुजरात राज्यांत सामायिक भांडवलाच्या ७३ नव्या कंपन्या स्थापन करण्यांत आल्या. त्या सर्व कंपन्यांचें मिळून अधिकृत भांडवल १९·५३ कोटी रुपयांचें होतें ह्या कंपन्यांपैकी २० सार्वजनिक भांडवलाच्या होत्या व बाकीच्या खाजगी भांडवलाच्या होत्या. १९६०-६१ च्या मानानें स्थापन झालेल्या कंपन्यांची संख्या जास्त आहे. परंतु अधिकृत भांडवल मात्र २० टक्क्यांनीं कमी आहे. १९६१-६२ सालांत २७ कंपन्यांना आपले व्यवहार बंद करावे लागले अगर त्या बंद पडल्या. त्यांपैकी १२ सार्वजनिक मालकीच्या व १५ खाजगी मालकीच्या होत्या.

### भारतामधील परदेशीय नागरिक

१ डिसेंबर, १९६२ अखेर भारतांत ५९,७४४ परदेशीय नागरिकांची नोंद झालेली होती. त्या मागील वर्षी ही संख्या ६१,७०६ होती. प्रमुख परदेशीय नागरिकांची संख्या अशी होती. तिबेटी : १४,९८८; चिनी : १०,६२७; इराणी : ४,५०१; अमेरिकन : ४,४२१; अफगाण : ३,६४८; जर्मन : २,९३०; ब्रह्मी : १,६२३; रशिअन : १,५८१; फ्रेंच : १,०४७ इटालिअन १,०४४; जपानी : ९३७; सयामी : ९१८. ह्या आकड्यांत १६ वर्षांखालील मुलांचा अगर कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील नागरिकांचा समावेश नाहीं. गेल्या वर्षी एकूण ६३,५२९ परदेशिय नागरिकांना भारतांत येण्याचे परवाने देण्यांत आले होते.


## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ता:—युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :—०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :-३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष—४¼ टक्के, २ वर्षें—४½ टक्के, ३ वर्षें—४¾ टक्के,
४ वर्षें—५ टक्के, ५ वर्षें—५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवीचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा—विस्तार

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७ बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर—मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१—१२—१९६२

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९,६०,८२५ |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ३,४३,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,००,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., *जनरल मॅनेजर.*

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. *चेअरमन.*



दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

## पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ—पुणें शहर.

व्याजाचे नवीन आकर्षक दर—

| | | | |
|---|---|---|---|
| चालू ठेव | ... | ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... | ... | ३ टक्के |

कायम ठेव—

| | | | |
|---|---|---|---|
| १ महिना | ... | ... | ३·३७ टक्के |
| ३ महिने | ... | ... | ३·५० टक्के |
| ६ महिने | ... | ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... | ... | ४·५० टक्के |

याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*

*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. वी. तांबट
कार्यकारी संचालक.

# अर्थ

बुधवार, ता. ३ एप्रिल, १९६३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परदेशी मदतीचा प्रवाह
### देणग्यांचे मानानें कर्जेंच जास्त

पी. एल. ४८० खालील व इतर कांहीं मदतींच्या बाबी वगळून १९६१ ते मार्च १९६२ अखेर भारताला एकूण २,२१० कोटी रुपयांची परदेशी मदत मिळाली. १ एप्रिल, १९६२ ते ३१ डिसेंबर, १९६२ अखेर आणखी ४२५ कोटी रुपयांची मदत मिळाली आहे. बहुतेक मदत कर्जाच्या स्वरूपाची आहे; देणगीच्या स्वरूपाची नाहीं. डिसेंबर, १९६२ अखेरच्या परदेशी देणग्यांची बेरीज फक्त ३०२ कोटी रुपये भरते; उरलेल्या २,३२२ कोटी रुपयांची आपल्याला सव्याज परतफेड करावी लागणार आहे.

ह्या मदतीमुळें भारताच्या आर्थिक विकासाला मदत झाली, हें तर उघड आहे. त्याबरोबरच, देणगीदारांना आपला माल भारतांत उधारीनें खपविण्याची उत्कृष्ट संधि मिळाली, हें विसरून चालणार नाहीं. अमेरिका, रशिया, इत्यादि देशांनीं अशा प्रकारें मदत केली नसती, तर त्यांची भारताकडे एवढी निर्गत होऊंच शकली नसती.

मदत करणाऱ्या देशांत अमेरिका अर्थातच अग्रस्थानीं आहे. १९६२ अखेर अमेरिकेनें ७२४ कोटी रुपयांचीं कर्जें दिलीं व १४० कोटी रुपयांच्या देणग्या दिल्या. पी. एल. ४८० खालील ११५६ कोटी रुपयांची व पी. एल. ६६५ खालील ३२ कोटी रुपयांची मदत ही वेगळीच. रशियानें दिलेल्या मदतीची बेरीज ३८५ कोटी रुपये झाली आहे. अमेरिकेनें दिलेली मदत खासगी विभागासाठी मुख्यत: आहे, तर रशियाची मदत सरकारी विभागांतील उपक्रमांसाठी आहे. दिलेल्या मदतीचा विनियोग आवश्यक त्या त्वरेनें केला जात नाहीं आणि योग्य त्या प्रकारें वापर होत नाहीं अशी भारत सरकारविरुद्ध टीका केली जात आहे. १९५१ ते १९६२ अखेर मिळालेल्या मदतींपैकी फक्त ६०% मदतच उपयोगांत आणली गेली आहे. अमेरिका आणि रशिआ ह्यांच्या खालोखाल ग्रेट ब्रिटनची मदत मिळत आहे. ऑस्ट्रेलिया, जपान, प. जर्मनी, फ्रान्स, झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया, पोलंड, इत्यादि देशहि आतां मदत देऊं लागले आहेत.

---

## कम्युनिझमच्या आकर्षणाला ओहोटी ?

आंतरराष्ट्रीय घडामोडींचा एक अमेरिकन निरीक्षक मि. रॉबर्ट ट्रंबुल ह्यानें, चीनमधील तरुणांना कम्युनिझमचें तत्त्वज्ञान आतां पूर्वीप्रमाणें आकृष्ट करीत नाहीं, असा अभिप्राय व्यक्त केला आहे. ह्यासंबंधी लिहिलेल्या लेखांत तो म्हणतो कीं, अलीकडे चीनमधील तरुण कम्युनिझमपासून विमुख होत चालले आहेत. चिनी सरकारनें शिक्षणाच्या पद्धतींत कांहीं सुधारणा केल्या. परंतु त्याचा परिणाम उलटा झाला. लायक शिक्षक आणि पुरेसे वर्ग ह्यांच्या अभावीं लाखों चिनी तरुणांना आपलें शिक्षण चालू ठेवतां येणें अशक्य झालें आहे. ह्याच तरुणांवर चिनी कम्युनिझमचें भवितव्य अवलंबून आहे. पण नेमके तेच बेकार आणि असमाधानी झाले आहेत. शांघायसारख्या मोठ्या शहरांतून मोठ्या प्रमाणावर बेकारी माजली आहे. उद्योगधंद्यांत अगर कारखान्यांत दहा दहा वर्षें अनुभव घेतलेले तरूणहि अनिच्छेनें स्वस्थ बसले आहेत. ज्या तरुणांनीं सुदैवानें उच्च शिक्षण घेतलें त्यांनाहि योग्यसें काम मिळेनासें झालें आहे. त्यामुळें चिनी तरुण सरकारवर टीका करूं लागला आहे. कम्युनिझमच्या तत्त्वज्ञानाविषयीं साशंकता त्याच्या चित्तांत निर्माण झाली आहे. सरकार त्याला स्वार्थत्यागी ध्येयवादाचे घुटके पाजत आहे. पण, त्याचें लक्ष मात्र स्वत:च्या भरभराटीकडेच अधिकाधिक लागत चालले आहे. भारत आणि जपानसारख्या मोठ्या लोकवस्तीच्या देशांत शिक्षणाच्या व रोजगाराच्या बाबतींत निराश झालेले तरुण कम्युनिझमकडे झुकत आहेत. त्याच वेळीं चीनमध्यें मात्र कम्युनिझमचें आकर्षण खालावत आहे.

---

## छोट्या कोळसा-खाणींना खाणीमंत्र्यांचा इषारा

इंडिअन माइनिंग फेडरेशन ह्या संघटनेची १५ वी वार्षिक सभा आणि संघटनेचा सुवर्णमहोत्सव कलकत्ता येथें साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं उद्‌घाटनाचें भाषण करतांना भारत सरकारचे खाणी व इंधनमंत्री श्री. के. डी. मालवीय म्हणाले कीं, भारतामधील कोळशाचें उत्पादन वाढत चाललें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. ह्या वाढत्या उत्पादनामुळें मार्च, १९६३ अखेर कोळशाचें उत्पादन ६·४ कोटी टनांपर्यंत पोंचलेलें असेल. मात्र ह्या यशामुळें कोळसाखाणीच्या धंद्यांत आत्मसंतुष्टतेची भावना निर्माण होता कामा नये. कारण, सध्यांच्या परिस्थितींत कोळशाचें अधिकाधिक उत्पादन कमी खर्चांत करणें अतिशय आवश्यक आहे. हें साध्य करण्यासाठी सरकार कोळशाच्या उद्योगधंद्याला संपूर्ण सहकार्य देण्यास तयार आहे. उत्पादन वाढविण्याच्या कामीं छोट्या खाणींनीं अधिक प्रयत्न करणें जरूर आहे. ज्या छोट्या खाणी त्यांच्यापुढें असणारे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करणार नाहींत त्यांचा स्पर्धेत टिकाव लागणार नाहीं, हें उघडच आहे. प्रत्येक छोट्या खाणीकडे व्यक्तिश: लक्ष पुरविणें सरकारला शक्य होणार नाहीं. ज्या छोट्या खाणीं स्पर्धेत टिकणार नाहींत त्यांना मोठ्या खाणींत सामावून जाण्याचा मार्गच तेवढा राहील. अशा प्रकारचें सामिलीकरण सर्वच दृष्टींनीं फायद्याचें ठरतें असा अनुभव आहे. खाजगी मालकीच्या ज्या खाणी योग्य तऱ्हेनें चालविण्यांत येत नाहींत त्यांच्यावर संघटनेनें लक्ष ठेवलें पाहिजे. अशी नजर ठेवण्यांत आली तर कोळशाच्या उत्पादनांतील कच्चे दुवे काढून टाकतां येतील.

---

# अर्थ

बुधवार, ता. ३ एप्रिल, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परदेशी मदतीचा प्रवाह

### देणग्यांचे मानानें कर्जेंच जास्त

पी. एल. ४८० खालील व इतर कांहीं मदतींच्या बाबी वगळून १९६१ ते मार्च १९६२ अखेर भारताला एकूण २,२१० कोटी रुपयांची परदेशी मदत मिळाली. १ एप्रिल, १९६२ ते ३१ डिसेंबर, १९६२ अखेर आणखी ४२५ कोटी रुपयांची मदत मिळाली आहे. बहुतेक मदत कर्जाच्या स्वरूपाची आहे; देणगीच्या स्वरूपाची नाहीं. डिसेंबर, १९६२ अखेरच्या परदेशी देणग्यांची बेरीज फक्त ३०२ कोटी रुपये भरते; उरलेल्या २,३२२ कोटी रुपयांची आपल्याला सव्याज परतफेड करावी लागणार आहे.

ह्या मदतीमुळें भारताच्या आर्थिक विकासाला मदत झाली, हें तर उघड आहे. त्याबरोबरच, देणगीदारांना आपला माल भारतांत उधारीनें खपविण्याची उत्कृष्ट संधि मिळाली, हें विसरून चालणार नाहीं. अमेरिका, रशिया, इत्यादि देशांनीं अशा प्रकारें मदत केली नसती, तर त्यांची भारताकडे एवढी निर्गत होऊंच शकली नसती.

मदत करणाऱ्या देशांत अमेरिका अर्थातच अग्रस्थानीं आहे. १९६२ अखेर अमेरिकेनें ७२४ कोटी रुपयांचीं कर्जे दिलीं व १४० कोटी रुपयांच्या देणग्या दिल्या. पी. एल. ४८० खालील ११५६ कोटी रुपयांची व पी. एल. ६६५ खालील ३२ कोटी रुपयांची मदत ही वेगळीच. रशियानें दिलेल्या मदतीची बेरीज ३८५ कोटी रुपये झाली आहे. अमेरिकेनें दिलेली मदत खासगी विभागासाठी मुख्यत: आहे, तर रशियाची मदत सरकारी विभागांतील उपक्रमांसाठी आहे. दिलेल्या मदतीचा विनियोग आवश्यक त्या त्वरेनें केला जात नाहीं आणि योग्य त्या प्रकारें वापर होत नाहीं अशी भारत सरकारविरुद्ध टीका केली जात आहे. १९५१ ते १९६२ अखेर मिळालेल्या मदतीपैकीं फक्त ६०% मदतच उपयोगांत आणली गेली आहे. अमेरिका आणि रशिआ ह्यांच्या खालोखाल ग्रेट ब्रिटनची मदत मिळत आहे. ऑस्ट्रेलिया, जपान, प. जर्मनी, फ्रान्स, झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया, पोलंड, इत्यादि देशांहि आतां मदत देऊं लागले आहेत.

---

## कम्युनिझमच्या आकर्षणाला ओहोटी ?

आंतरराष्ट्रीय घडामोडींचा एक अमेरिकन निरीक्षक मि. रॉबर्ट ट्रंबुल ह्यानें, चीनमधील तरुणांना कम्युनिझमचें तत्त्वज्ञान आतां पूर्वीप्रमाणें आकृष्ट करीत नाहीं, असा अभिप्राय व्यक्त केला आहे. ह्यासंबंधीं लिहिलेल्या लेखांत तो म्हणतो कीं, अलीकडे चीनमधील तरुण कम्युनिझमपासून विमुख होत चालले आहेत. चिनी सरकारनें शिक्षणाच्या पद्धतींत कांहीं सुधारणा केल्या. परंतु त्याचा परिणाम उलटा झाला. लायक शिक्षक आणि पुरेसे वर्ग ह्यांच्या अभावीं लाखों चिनी तरुणांना आपलें शिक्षण चालू ठेवतां येणें अशक्य झालें आहे. ह्याच तरुणांवर चिनी कम्युनिझमचें भवितव्य अवलंबून आहे. पण नेमके तेच बेकार आणि असमाधानी झाले आहेत. शांघायसारख्या मोठ्या शहरांतून मोठ्या प्रमाणावर बेकारी माजली आहे. उद्योगधंद्यांत अगर कारखान्यांत दहा दहा वर्षें अनुभव घेतलेले तरुणहि अनिच्छेनें स्वस्थ बसले आहेत. ज्या तरुणांनीं सुदैवानें उच्च शिक्षण घेतलें त्यांनाहि योग्यसें काम मिळेनासें झालें आहे. त्यामुळें चिनी तरुण सरकारवर टीका करूं लागला आहे. कम्युनिझमच्या तत्त्वज्ञानाविषयीं साशंकता त्याच्या चित्तांत निर्माण झाली आहे. सरकार त्याला स्वार्थत्यागी ध्येयवादाचे घुटके पाजत आहे. पण, त्याचें लक्ष मात्र स्वत:च्या भरभराटीकडेच अधिकाधिक लागत चालले आहे. भारत आणि जपानसारख्या मोठ्या लोकवस्तीच्या देशांत शिक्षणाच्या व रोजगाराच्या बाबतींत निराश झालेले तरुण कम्युनिझमकडे झुकत आहेत. त्याच वेळीं चीनमध्यें मात्र कम्युनिझमचें आकर्षण खालावत आहे.

---

## छोट्या कोळसा-खाणींना खाणीमंत्र्यांचा इशारा

इंडिअन माइनिंग फेडरेशन ह्या संघटनेची १५ वी वार्षिक सभा आणि संघटनेचा सुवर्णमहोत्सव कलकत्ता येथें साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं उद्‌घाटनाचें भाषण करतांना भारत सरकारचे खाणी व इंधनमंत्री श्री. के. डी. मालवीय म्हणाले कीं, भारतामधील कोळशाचें उत्पादन वाढत चाललें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. ह्या वाढत्या उत्पादनामुळें मार्च, १९६३ अखेर कोळशाचें उत्पादन ६·४ कोटी टनांपर्यंत पोंचलेलें असेल. मात्र ह्या यशामुळें कोळसाखाणीच्या धंद्यांत आत्मसंतुष्टतेची भावना निर्माण होता कामा नये. कारण, सध्यांच्या परिस्थितींत कोळशाचें अधिकाधिक उत्पादन कमी खर्चांत करणें अतिशय आवश्यक आहे. हें साध्य करण्यासाठीं सरकार कोळशाच्या उद्योगधंद्याला संपूर्ण सहकार्य देण्यास तयार आहे. उत्पादन वाढविण्याच्या कामीं छोट्या खाणींनीं अधिक प्रयत्न करणें जरूर आहे. ज्या छोट्या खाणी त्यांच्यापुढें असणारे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करणार नाहींत त्यांचा स्पर्धेंत टिकाव लागणार नाहीं, हें उघडच आहे. प्रत्येक छोट्या खाणीकडे व्यक्तिश: लक्ष पुरविणें सरकारला शक्य होणार नाहीं. ज्या छोट्या खाणी स्पर्धेंत टिकणार नाहींत त्यांना मोठ्या खाणींत सामावून जाण्याचा मार्गच तेवढा राहील. अशा प्रकारचें सामिलीकरण सर्वच दृष्टींनीं फायद्याचें ठरतें असा अनुभव आहे. खाजगी मालकीच्या ज्या खाणी योग्य तऱ्हेनें चालविण्यांत येत नाहींत त्यांच्यावर संघटनेनें लक्ष ठेवलें पाहिजे. अशी नजर ठेवण्यांत आली तर कोळशाच्या उत्पादनांतील कच्चे दुवे काढून टाकतां येतील.

---

## रेल्वेच्या विकासासाठी अमेरिकेची मदत

जागतिक बँकेशीं संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय-विकास-मंडळानें भारताला ६·७५ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे. १९६३ सालीं रेल्वेच्या विकासासाठी जो कार्यक्रम आंखण्यांत आला आहे तो पार पाडण्यासाठी लागणारें साहित्य ह्या कर्जाचा उपयोग करून आयात करण्यांत येणार आहे. रेल्वेचीं एंजिनें बांधणें, निरनिराळ्या प्रकारचे डबे बांधणें, रेल्वेमार्गाचें विद्युतीकरण करणें इत्यादि कामासाठी लागणारी यांत्रिक सामग्री व सुटे भाग ह्यांची भारताच्या रेल्वेला जरूर लागते. १९६१ ते १९६६ ह्या कालासाठी रेल्वेनें जो विकासाचा कार्यक्रम आंखला आहे त्यांत अधिक वजन नेणाऱ्या व अधिक गतीनें जाणाऱ्या गाड्या सोडण्यावर विशेष भर देण्यांत आलेला आहे. ही अवजड वाहतूक मुख्यतः डिझेल तेलावर चालणाऱ्या अगर विजेवर चालणाऱ्या एंजिनांच्या साह्यानें करण्यांत यावयाची आहे. सुमारें १,६०० मैल मार्गाचें विद्युतीकरण करण्यांत यावयाचें आहे. त्याशिवाय जास्त माल नेऊं शकणारे ८०,००० नवे मालवाहतूक डबे बांधण्यांत यावयाचे आहेत. ह्या इतर आनुषंगिक कामासाठी परदेशीय चलनाच्या स्वरूपांत मोठा खर्च करावा लागतो. तो भागविण्याच्या कामीं जागतिक बँकेनें मोलाची मदत केलेली आहे. गेल्या १४ वर्षांच्या अवधींत रेल्वेच्या विकासासाठी जागतिक बँकेनें ६ कर्जें दिलेलीं आहेत. सर्व कर्जांची मिळून रक्कम ३७·८ कोटी डॉलर्सच्या घरांत जाते. १९६१ ते १९६६ मधील विकासाच्या कामासाठी करण्यांत यावयाच्या खर्चापैकी सुमारें २४९ कोटी रुपये परदेशीय चलनाच्या स्वरूपांत लागणार आहेत.

## माजी संस्थानिकांच्या सुरक्षिततेसाठी खर्च

मध्यप्रदेशांतील विलीन झालेल्या संस्थानांच्या माजी अधिपतींच्या सुरक्षिततेसाठी राज्यसरकार ८·५० लाख रुपये खर्च करतें. अशा २३ अधिपतींसाठी सरकारला खर्च करावा लागतो व त्या कामीं ६५० पोलिस अधिकाऱ्यांना कामावर ठेवावें लागतें. सर्वांत जास्त खर्च भोपाळच्या बेगमेसाठी करण्यांत येतो. बेगमेच्या सुरक्षिततेसाठी ८७ पोलिस अधिकारी दक्ष असतात व त्या कामीं १·१५ लाख रुपये खर्च करण्यांत येतात. ग्वाल्हेरच्या संस्थानिकासाठी ७८,०५५ रुपये खर्च करण्यांत येतात आणि इंदूरच्या संस्थानिकासाठी ५५,००० रुपये खर्च करण्यांत येतात.

## अधिक खेड्यांना विजेचा पुरवठा

चालू आर्थिक वर्षांत हिंदमधील ५,००० अधिक खेड्यांना विजेचा पुरवठा करण्यांत येऊं लागेल. १९६१–६२ सालाशीं तुलना करतां ही संख्या २,००० नीं अधिक आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत १०,००० खेड्यांना विजेचा पुरवठा करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. हें उद्दिष्ट गाठण्यांत येऊन त्याशिवाय आणखी, २,५०६ खेड्यांना विजेची सोय उपलब्ध करून देण्यांत आली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत २०,००० खेड्यांना विजेचा पुरवठा करण्याचें ठरविण्यांत आलें असून ह्या कामासाठी १०५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. विजेच्या तारा नेण्यासाठी लागणारे लाकडी खांब स्थानिकरीत्या मिळविण्यांत येणार आहेत. ते टिकाऊ करण्याचे प्रयत्न होत आहेत.



## रेल्वेच्या विकासासाठी अमेरिकेची मदत

जागतिक बँकेशीं संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय-विकास-मंडळानें भारताला ६·७५ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे. १९६३ सालीं रेल्वेच्या विकासासाठी जो कार्यक्रम आंखण्यांत आला आहे तो पार पाडण्यासाठी लागणारें साहित्य ह्या कर्जाचा उपयोग करून आयात करण्यांत येणार आहे. रेल्वेचीं एंजिनें बांधणें, निरनिराळ्या प्रकारचे डबे बांधणें, रेल्वेमार्गांचें विद्युतीकरण करणें इत्यादि कामासाठी लागणारी यांत्रिक सामग्री व सुटे भाग ह्यांची भारताच्या रेल्वेला जरूर लागते. १९६१ ते १९६६ ह्या कालासाठी रेल्वेनें जो विकासाचा कार्यक्रम आंखला आहे त्यांत अधिक वजन नेणाऱ्या व अधिक गतीनें जाणाऱ्या गाड्या सोडण्यावर विशेष भर देण्यांत आलेला आहे. ही अवजड वाहतूक मुख्यत: डिझेल तेलावर चालणाऱ्या अगर विजेवर चालणाऱ्या एंजिनांच्या साह्यानें करण्यांत यावयाची आहे. सुमारें १,६०० मैल मार्गाचें विद्युतीकरण करण्यांत यावयाचें आहे. त्याशिवाय जास्त माल नेऊं शकणारे ८०,००० नवे मालवाहतूक डबे बांधण्यांत यावयाचे आहेत. ह्या इतर आनुषंगिक कामासाठी परदेशीय चलनाच्या स्वरूपांत मोठा खर्च करावा लागतो. तो भागविण्याच्या कामीं जागतिक बँकेनें मोलाची मदत केलेली आहे. गेल्या १४ वर्षांच्या अवधींत रेल्वेच्या विकासासाठी जागतिक बँकेनें ६ कर्जें दिलेलीं आहेत. सर्व कर्जांची मिळून रक्कम ३७·८ कोटी डॉलर्सच्या घरांत जाते. १९६१ ते १९६६ मधील विकासाच्या कामासाठी करण्यांत यावयाच्या खर्चांपैकी सुमारें २४९ कोटी रुपये परदेशीय चलनाच्या स्वरूपांत लागणार आहेत.

## माजी संस्थानिकांच्या सुरक्षिततेसाठी खर्च

मध्यप्रदेशांतील विलीन झालेल्या संस्थानांच्या माजी अधिपतींच्या सुरक्षिततेसाठी राज्यसरकार ८·५० लाख रुपये खर्च करतें. अशा २३ अधिपतींसाठी सरकारला खर्च करावा लागतो व त्या कामीं ६५० पोलिस अधिकाऱ्यांना कामावर ठेवावें लागतें. सर्वांत जास्त खर्च भोपाळच्या बेगमेसाठी करण्यांत येतो. बेगमेच्या सुरक्षिततेसाठी ८७ पोलिस अधिकारी दक्ष असतात व त्या कामीं १·१५ लाख रुपये खर्च करण्यांत येतात. ग्वाल्हेरच्या संस्थानिकासाठी ७८,०५५ रुपये खर्च करण्यांत येतात आणि इंदूरच्या संस्थानिकासाठी ५५,००० रुपये खर्च करण्यांत येतात.

## अधिक खेड्यांना विजेचा पुरवठा

चालू आर्थिक वर्षात हिंदमधील ५,००० अधिक खेड्यांना विजेचा पुरवठा करण्यांत येऊं लागेल. १९६१–६२ सालाशीं तुलना करतां ही संख्या २,००० नीं अधिक आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत १०,००० खेड्यांना विजेचा पुरवठा करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. हें उद्दिष्ट गाठण्यांत येऊन त्याशिवाय आणखी, २,५०६ खेड्यांना विजेची सोय उपलब्ध करून देण्यांत आली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत २०,००० खेड्यांना विजेचा पुरवठा करण्याचें ठरविण्यांत आलें असून ह्या कामासाठी १०५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. विजेच्या तारा नेण्यासाठी लागणारे लाकडी खांब स्थानिकरीत्या मिळविण्यांत येणार आहेत. ते टिकाऊ करण्याचे प्रयत्न होत आहेत.


MAR. OTM-118

लहान बाल-बालिकांसाठीं
व रसिक हृदयाच्या
व्यक्तींसाठीं मनमोहक वस्त्रप्रावरणें

ठाकरसी
फॅब्रिक्स
'फॅशनसाठीं सर्वोत्तम पसंती

·SANFORIZED·



THACKERSEY FABRICS

ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स
● धी क्राउन स्पिनिंग ॲण्ड मॅन्यु. कंपनी लिमिटेड
● धी वेस्टर्न इंडिया स्पिनिंग ॲण्ड मॅन्यु. कंपनी लिमिटेड
● धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड
● धी हिंदुस्तान स्पिनिंग ॲण्ड वीव्हिंग मिल्स कंपनी लिमिटेड

## सुवर्ण नियंत्रण हुकुमाविरुद्ध अर्ज

भारत सरकारच्या सुवर्णनियंत्रण हुकुमाविरुद्ध कलकत्ता येथील एका पुजाऱ्यानें कलकत्ता हायकोर्टात अर्ज दाखल केला आहे. हा पुजारी 'श्रीराधा' ह्या देवतेच्या मूर्तीची पूजा करीत असतो. अर्जदार पुजाऱ्याचें म्हणणें असें आहे कीं त्याच्या ताब्यांत असलेली पूजेची मूर्ति अष्टधातूची बनविलेली असून तिच्या डोक्यावर कायम स्वरूपाचा सोन्याचा रत्नजडित मुगुट आहे. सरकारनें काढलेल्या सुवर्ण-नियंत्रण हुकमाचें पालन करणें व जरूर तो फॉर्म माहिती भरून देणें त्याला शक्य होणार नाहीं. विशेषत: सोन्याचें वजन, वर्णन व इतर माहिती मूर्ति वितळविल्याशिवाय देणें अशक्य आहे. मूर्ति वितळवून कायद्याप्रमाणें जरूर असणारी माहिती पुरवितां येणें शक्य असलें तरी त्याला तसें करतां येणार नाहीं. अर्जदार हिंदु असल्यानें मूर्तीची अशी विटंबना करणें अत्यंत अधार्मिक कृत्य होईल. शिवाय ही मूर्ति तिच्या जागेवरून आजपर्यंत कधींहि हलविण्यांत आलेली नाहीं. मूर्ति हलवावयाचीच झाल्यास ब्राह्मण पुजाऱ्याशिवाय दुसऱ्या कोणालाहि तसें करतां येणार नाहीं. कलकत्ता हायकोर्टाचे न्यायाधीश श्री. बॅनर्जी ह्यांनीं अर्जदाराचा अर्ज दाखल करून घेऊन सुवर्ण–नियंत्रण बोर्डाकडे व सरकारकडे ह्या बाबतींत पृच्छा केली आहे. सुवर्ण-नियंत्रण बोर्डानें केलेले नियम घटनाबाह्य कां ठरविण्यांत येऊ नयेत ह्याविषयीं कारणें दाखविण्याची नोटीस बोर्डाला व सरकारला देण्यांत आली आहे.

## भारताच्या पोलादाच्या धंद्याची वाढ

भारताच्या राष्ट्रीय–उत्पादन–मंडळाचा एक अभ्यासगट रशिआ व झेकोस्लोव्हाकिआ ह्या देशांतील पोलादाच्या धंद्याचा अभ्यास करण्यासाठी व त्या अनुरोधानें भारताच्या पोलादाच्या धंद्याला मार्गदर्शन करण्यासाठी त्या देशांच्या दौऱ्यावर गेला होता. गटानें आपला अहवाल आतां मध्यवर्ती सरकारला सादर केला आहे. अहवालांत असें म्हटलें आहे कीं पोलादाचा धंदा हा मूलभूत धंदा असल्यानें भारतासारख्या अपुरा विकास झालेल्या देशांत त्याला अग्रस्थान देण्याशिवाय गत्यंतरच नाहीं. पोलादाच्या धंद्याच्या वाढीसाठीं लागणारी परिस्थिति आणि कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा ह्या दोन्ही बाबतींत भारताला काळजी करण्याचें मुळींच कारण नाहीं; मात्र भारतानें ह्या धंद्यांतील अद्ययावत् तांत्रिक प्रगतीचा उपयोग करून घेतला पाहिजे. तसा उपयोग करून घेण्यांत आल्यास भारत हा जगांतील एक प्रमुख पोलाद–उत्पादक देश होऊं शकेल. रशिया आणि झेकोस्लोव्हाकिआ ह्या दोन देशांनीं आपल्या पोलादाच्या धंद्याचा विस्तार अल्पावधींत घडवून आणलेला आहे. म्हणून त्यांच्या अनुभवाचा फायदा भारताला मिळण्यासारखा आहे. रशिआ व झेकोस्लोव्हाकिआ ह्या दोन्ही देशांनीं आपल्या पोलादाच्या धंद्याचें प्रादेशिक विकेंद्रीकरण केलेलें आहे. तसेंच विकेंद्रीकरण भारतानें करणें जरूर आहे. सध्यां हिंदमधील पोलादाचा धंदा पूर्व भारतांत एकवटलेला दिसून येतो. मध्यभारतांत व दक्षिण भारतांत पोलादाच्या धंद्याचीं दोन आणखी केंद्रें स्थापन करणें अगत्याचें आहे. त्याशिवाय गोवा, विशाखापट्टम्सारख्या ठिकाणींहि केंद्रें स्थापन करावींत.

**औद्योगिक तज्ज्ञांचा दौरा** — भारताच्या औद्योगिक विकासाची माहिती करून घेण्यासाठी अमेरिकन लष्कराच्या औद्योगिक कॉलेजचें एक प्रतिनिधिमंडळ लवकरच भारताच्या दौऱ्यावर येणार आहे. दौरा दोन आठवड्यांचा आहे. मंडळांत १३ सभासद आहेत.

## केळ्यांची निर्यात वाढविण्याचे प्रयत्न

भारताची केळ्यांची निर्यात वाढविण्यासाठीं सरकारी व बिनसरकारी सभासद असलेली एक कमिटी स्थापन करण्यांत आली आहे. १९६२ मध्यें भारतामधून निर्यात करण्यांत आलेल्या केळ्यांत घट झाल्यानें ह्या प्रश्नाकडे अधिक लक्ष देण्यांत येत आहे. सध्यां मध्यपूर्वेतील देशांना व पाकिस्तानलाच फक्त केळीं निर्यात करण्यांत येतात. रशिआला २ कोटी रुपयांचीं केळीं निर्यात करतां येण्याची शक्यता अजमावण्यांत येत आहे. तूर्त प्रयोग म्हणून रशिआ ४,००० टन केळीं घेण्यास तयार आहे. येत्या ऑगस्ट–सप्टेंबरमध्यें महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केटिंग सोसायटीतर्फे तीं पाठविण्यांत येतील. भारतांत केळ्यांच्या लागवडीखालीं ३·९ लाख एकर जमीन असावी, असा अंदाज आहे. १९६०–६१ सालीं ६० कोटी रुपयांची २०·९ लाख टन केळीं निर्माण करण्यांत आली.

## प्राप्तीवरील कराचा जास्तींत जास्त भरणा

१९६०–६१ सालीं प्राप्तीवरील कर भरण्यास पात्र अशा एका व्यक्तीनें २३ लाख रुपये कर भरला. कंपन्यांपैकी एका कंपनीनें २७८·९ लाख रुपये प्राप्तीवरील कर भरला. ह्याच सालीं दरमहा ३,००० रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या ११,७२४ व्यक्तींची नोंद झालेली आहे. ह्या संख्येंत खाजगी विभागांतील व सार्वजनिक विभागांतील अशांचा समावेश आहे. मात्र खाजगी विभागांतील अशा व्यक्ती किती आणि सार्वजनिक विभागांतील किती, अशी फोड उपलब्ध नाहीं. राज्यसभेंत ही माहिती सांगण्यांत आली त्या वेळीं खाजगी विभागांतील दरमहा, ३००० रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्याची माहिती विचारण्यांत आली होती.


# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना—१९३० ] [ शेड्यूल्ड बँक

— हेड ऑफिस आणि रजिस्टर्ड ऑफिस —

रविवार पेठ, बेळगांव, म्हैसूर राज्य.

तार : SERVICE फोन : ११८

अधिकृत भांडवल : रु. १० लक्ष
वसूल भांडवल : रु. ८ लक्ष
रिझर्व्ह आणि इतर फंड : रु. ६ लक्ष
एकूण ठेवी : रु. २ कोटींचे वर

— संचालक मंडळ —

१. श्री. एस. एम. मुन्नूर, चेअरमन
२. श्री. एस. व्ही. कलघटगी, व्हाइस चेअरमन
३. श्री. बी. बी. पोतदार, बी. ए., एलएल्. बी.
४. श्री. जी. व्ही. सराफ, बी. ए., एलएल्. बी.
५. श्री. एम. जी. हेरेकर
६. श्री. एल. व्ही. देशपांडे
७. श्री. ए. आर. नाईक, बी. ए., बी. एस्सी. एलएल्. बी. मॅनेजिंग डायरेक्टर

श्री. एच. एस. कुलकर्णी, बी. ए. मॅनेजर.

*म्हैसूर राज्यांत १६ आणि महाराष्ट्र राज्यांत ११ शाखा*

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

म्हैसूर राज्यांतील हुबळी आणि मुधोळ ह्या ठिकाणीं शाखा उघडण्यास बँकेस संमति मिळाली असून त्या शाखा यथाकाल सुरू होतील.

### सीलोनच्या चहाची रशियाकडून खरेदी

सीलोनच्या सरकारी मालकीच्या कॉर्पोरेशननें पाश्चात्य देशांतील तेल कंपन्यांकडून घ्यावयाच्या तेलावर मर्यादा घातलेली आहे व आपल्या गरजा रशिआकडून तेलाची अधिक आयात करून भागविण्यास प्रारंभ केला आहे. सीलोनला तेलाची किंमत देणें सुलभ व्हावें म्हणून रशिआनें चालू वर्षी ६० लाख पौंड चहा खरेदी करण्याचें ठरविलें आहे. ही खरेदी गेल्या वर्षीच्या खरेदीपेक्षा १० लाख पौंडांनीं अधिक आहे. सुमारें २० लाख पौंड चहा पाठविण्यांतहि आला आहे. रशिआनें सीलोनकडून २,५०० टन खोबरेल तेलही घेतलें आहे. त्यामुळें सिलोनमधील खोबऱ्याच्या तेलाचे भाव तेजींत गेले आहेत. रशिआप्रमाणेंच चीननेंहि सिलोनकडून ५०० टन खोबरेल तेल खरेदी केलें आहे.

### निजामाकडील विजेच्या पुरवठ्याबद्दल येणें

हैद्राबादच्या निजामाला १९६१-६२ सालीं केलेल्या विजेच्या पुरवठ्याबद्दल त्याच्याकडून ७·५ लाख रुपये विलादाखल येणें आहे अशी माहिती आंध्र राज्याच्या विधानसभेंत देण्यांत आली. निजामाच्या म्हणण्याप्रमाणें संस्थानी राजवट असल्यापासून विजेचा पुरवठा सवलतीच्या दरानें करण्यांत येत आहे व तो तसाच पुढें चालू राहिला पाहिजे. राज्य सरकार आतां कायदेपंडितांचा सल्ला घेणार आहे.

### ब्रिटनकडून केलेली विमानांची आयात

ह्या वर्षाच्या जानेवारी महिन्यांत भारतानें ब्रिटनकडून ९ लाख पौंड किंमतीचीं विमानें आणि विमानांचीं एंजिनें आयात केलीं. जानेवारींत ब्रिटनमधील विमानाच्या कारखान्यांनीं १·२० कोटी पौंड किंमतीच्या मालाची निर्यात केली. त्यांपैकीं ५८ लाख पौंड किंमतीचीं विमानें अगर त्यांचे सुटे भाग होते; व ५९ लाख पौंड किंमतीचीं विमानांचीं एंजिनें होतीं. विमानांच्या खरेदीबाबत भारताचा, इजिप्तच्या खालोखाल दुसरा क्रमांक लागतो. विमानांच्या एंजिनांच्या खरेदीच्या बाबतींत भारताचा क्रमांक तिसरा लागतो. ह्या बाबतींत पश्चिम जर्मनीचा पहिला व फ्रान्सचा दुसरा क्रमांक आहे.

### संस्थानिकाच्या मालमत्तेचा लिलांव

दरभंगा महाराजांच्या कांहीं जंगम मालाचा लिलांव दिल्ली येथें करण्यांत आला. ह्या मालांत झेक बनावटीचें मंद निळसर रंगाचें एक मोठें झुंबर आहे. हें झुंबर ६० वर्षांपूर्वी ६० हजार रुपये किंमतीस विकत घेण्यांत आलें होतें. त्याचा लिलांव अवघ्या १६,५०० रुपयांस गेला. झुंबरांत ५० मेणबत्त्या लावण्याची सोय आहे. तें पूर्वी संस्थानच्या दरबार–महालांत टांगण्यांत येत असे.





आपले ऊसाचे, हळदीचे अथवा गव्हाचे कोणतेही पीक असो, त्यासाठीं पाणी पुरवठा मात्र बिनचुक झाला पाहिजे. परंतु त्याबाबत काळजी करण्याचे कारण नाहीं. हे काम किर्लोस्कर पंपिंग सेटस् तत्परतेने पार पाडतात. किर्लोस्कर पंपिंग सेटसची रचना शास्त्रशुद्ध व मजबूत असल्याने ते वर्षानुवर्षे विनासायास काम देतात. हे सेटस् सरकारी तगाई योजनेखालीही मिळतात. पंपाच्या योग्य निवडीसाठीं तांत्रिक सल्ला मोफत दिला जातो.

सविस्तर माहितीसाठी आमच्या नजिकच्या अधिकृत विक्रेत्याकडे अथवा आमच्याकडे लिहा.

**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड**

किर्लोस्करवाडी, जि. सांगली

STUSA KM 1/61

### सीलोनच्या चहाची रशियाकडून खरेदी

सीलोनच्या सरकारी मालकीच्या कॉर्पोरेशननें पाश्चात्य देशांतील तेल कंपन्यांकडून घ्यावयाच्या तेलावर मर्यादा घातलेली आहे व आपल्या गरजा रशिआकडून तेलाची अधिक आयात करून भागविण्यास प्रारंभ केला आहे. सीलोनला तेलाची किंमत देणें सुलभ व्हावें म्हणून रशिआनें चालू वर्षी ६० लाख पौंड चहा खरेदी करण्याचें ठरविलें आहे. ही खरेदी गेल्या वर्षीच्या खरेदीपेक्षा १० लाख पौंडांनीं अधिक आहे. सुमारें २० लाख पौंड चहा पाठविण्यांतहि आला आहे. रशिआनें सीलोनकडून २,५०० टन खोबरेल तेलही घेतलें आहे. त्यामुळें सिलोनमधील खोबऱ्याच्या तेलाचे भाव तेजींत गेले आहेत. रशिआप्रमाणेंच चीननेंहि सिलोनकडून ५०० टन खोबरेल तेल खरेदी केलें आहे.

### निजामाकडील विजेच्या पुरवठ्याबद्दल येणें

हैदराबादच्या निजामाला १९६१–६२ सालीं केलेल्या विजेच्या पुरवठ्याबद्दल त्याच्याकडून ७·५ लाख रुपये विलादाखल येणें आहे अशी माहिती आंध्र राज्याच्या विधानसभेंत देण्यांत आली. निजामाच्या म्हणण्याप्रमाणें संस्थानी राजवट असल्यापासून विजेचा पुरवठा सवलतीच्या दरानें करण्यांत येत आहे व तो तसाच पुढें चालू राहिला पाहिजे. राज्य सरकार आतां कायदेपंडितांचा सल्ला घेणार आहे.

### ब्रिटनकडून केलेली विमानांची आयात


ह्या वर्षाच्या जानेवारी महिन्यांत भारतानें ब्रिटनकडून ९ लाख पौंड किंमतीचीं विमानें आणि विमानांचीं एंजिनें आयात केलीं. जानेवारींत ब्रिटनमधील विमानांच्या कारखान्यांनीं १·२० कोटी पौंड किंमतीच्या मालाची निर्यात केली. त्यांपैकी ५८ लाख पौंड किंमतीचीं विमानें अगर त्यांचे सुटे भाग होते; व ५९ लाख पौंड किंमतीचीं विमानांचीं एंजिनें होतीं. विमानांच्या खरेदीबाबत भारताचा, इजिप्तच्या खालोखाल दुसरा क्रमांक लागतो. विमानांच्या एंजिनांच्या खरेदीच्या बाबतींत भारताचा क्रमांक तिसरा लागतो. ह्या बाबतींत पश्चिम जर्मनीचा पहिला व फ्रान्सचा दुसरा क्रमांक आहे.

### संस्थानिकाच्या मालमत्तेचा लिलांव

दरभंगा महाराजांच्या कांहीं जंगम मालाचा लिलांव दिल्ली येथें करण्यांत आला. ह्या मालांत झेक बनावटीचें मंद निळसर रंगाचें एक मोठें झुंबर आहे. हें झुंबर ६० वर्षांपूर्वी ६० हजार रुपये किंमतीस विकत घेण्यांत आलें होतें. त्याचा लिलांव अवघ्या १६,५०० रुपयांस गेला. झुंबरांत ५० मेणबत्त्या लावण्याची सोय आहे. तें पूर्वी संस्थानच्या दरबार–महालांत टांगण्यांत येत असे.



## श्रीछत्रपति शिवाजी सहकारी साखर कारखाना लि.



चेअरमन
श्री. माणिकराव सोपानराव जाचक

कांहीं लोकांचा ज्योतिषावर नितांत विश्वास असतो; तर कांहींचा 'म्हटलं तर आहे अन् म्हटलं तर नाहीं' अशा स्वरूपाचा दिसून येतो. या उलट, प्रथम ज्योतिषाबद्दल अविश्वास बाळगणारे, जेव्हां त्यांच्या आयुष्यांत ते नाकारीत असणारी घटना अचूक घडते तेव्हां ते ज्योतिष खरें आहे असें म्हणण्यास तयार होतात. हाच अनुभव "श्रीछत्रपति शिवाजी सहकारी साखरकारखाना, लि. भवानीनगर (सणसर), जि. पुणें." या कारखान्याचे विद्यमान चेअरमन श्री. माणिकराव सोपानराव जाचक यांच्या बाबतींत आला. त्याचें असें झालें—या कारखान्याच्या सरकारनियुक्त पहिल्या संचालक मंडळाची मुदत १९६१ च्या सहकारी वर्षअखेरीस संपत होती. पुढील वर्षासाठी जें संचालक मंडळ कारभार पाहणार होतें तें निवडून यावयाचें होतें. सप्टेंबर १९६१ मध्यें निवडणुका होऊन श्री. माणिकराव त्यांत निवडून आले. चेअरमन होण्याची त्यांची इच्छा नव्हती. पण एका ज्योतिषानें त्यांना निक्षून सांगितलें होतें कीं, यंदा चेअरमनपद तुमचेकडेच येणार. माणिकराव नाहीं म्हणत होते. शेवटीं झालें तसेंच. तेच चेअरमन म्हणून निवडून आले.

कोठल्याहि पदाची अभिलाषा न धरणाऱ्या पण सतत कार्यरत राहणाऱ्या माणिकरावांचा पूर्वेतिहास पाहण्यासारखा आहे. त्यांचे वडील कै. रा. ब. सोपानराव तुकाराम जाचक हे मूळचे इंदापूर तालुक्यांतील निंबोडी या गांवचे. हे सहा बंधू. पैकी सोपानरावांचा क्रमांक तिसरा, निंबोडीहून निघून ते बारामती-जवळील मोतीबाग या वस्तीवर राहावयास व उद्योगासाठी आले. पूर्वीची आपली एक म्हण आहे, 'न मिळे भीक तर मास्तरकी शीक', सोपानराव खरोखरच तेथें एक 'गांवठी' शाळा काढून मास्तर झाले, आणि तेव्हांपासून रावबहादूर होईपर्यंत ते मास्तर म्हणून ओळखले जाऊं लागले. पुढें ते शेतींत पडले. उद्योगशीलतेनें आणि चिकाटीनें ते यथाकाल एक वडे बागायतदार झाले. उत्कर्षाचा सोपान झरझर चढून जाण्यास सोपानरावांना दैवानेंहि चांगलाच हात दिला. समाजांत, सरकारांत, त्यांनीं प्रतिष्ठा प्राप्त करून घेऊन स्वतःचें आणि स्वतःच्या कुळाचें नांव संस्मरणीय करून ठेविलें. रावबहादुरांचे थोरले चिरंजीव श्री. माणिकराव. ते वडिलांप्रमाणेंच कर्तव्यरत आणि कष्टाळू कृषिवल आहेत. त्यांचा जन्म दि. २३।११।२५ रोजीं झाला. मर्दानी खेळाची आणि व्यायामाची त्यांना फार आवड. व्यायामाचे ओढीनें ते बडोदें येथें जाऊन प्रो. माणिकराव यांच्या जुम्मादादा व्यायामशाळेंत त्यांनीं कुस्ती, लाठी-काठी यांचें शिक्षण घेतलें. त्यांची शरीरयष्टि मजबूत आणि चपळ असण्याचें कारण त्यांची व्यायामविषयक आवड हें होय. पुढें १९४४ सालीं ते शेतीच्या धंद्यांत पडले. शेतीची त्यांची आवड वडिलार्जित कीं स्वाभाविक हें ठरविणें सुलभ नाहीं. शेती ते 'बाबा वाक्यं प्रमाणम्' किंवा चालू चाकोरींतून करीत नाहींत. शेती करण्याची त्यांची पद्धति स्वतंत्र आणि स्वानुभवसिद्ध आहे. शेती हा धंदा आहे असें समजून ते करतात. शेतीबद्दलचें त्यांचें अर्थशास्त्र आहे. थोडक्यांत म्हणजे ते एक प्रयोगशील आणि प्रगत शेतकरी आहेत. एकदां त्यांनीं रताळ्याचें पीक घेतलें. त्याचें एकरी उत्पन्न ४०० मण आणून दाखविलें. हाच मामला उसाच्या बाबतींतहि. आतां त्यांचें लक्ष उसाच्या तुऱ्यावरून द्राक्षाच्या वेलांकडे वळलें आहे. प्रत्येक पिकाची त्यांना सशास्त्र माहिती आहे. त्यांना जनावरांचा फार षोक आहे. त्यांच्या गोठ्यांत खिलार बैलांजवळ रेड सिंधी गाई आणि ऑस्ट्रेलिअन ब्रीडच्या शेळ्या आणि बोकड बांधलेले दिसतात. त्यांना प्रसिद्धीचें वावडें असून चहा वर्ज्य आहे. त्यांचें एक वैशिष्ट्य म्हणजे ते उत्कृष्ट अश्वपरीक्षक आहेत. घोड्याच्या अंगच्या खोडी आणि अशुभसूचक गोष्टी ते एक प्रकारच्या अंतर्ज्ञानानें अचूक हेरतात ! या भागांतील घोडे खरेदी करणारांचे ते सल्लागार आहेत.

सार्वजनिक कामाची त्यांना आवड आहे, पण आसक्ति नाहीं. ते म्हणतात कीं आसक्ति असली कीं माणूस अपरिहार्यपणें स्वतःचा गाजावाजा करून घेण्याच्या बेहोषींत सांपडून खरें कार्य करण्यापासून दुरावतो. त्याला फक्त प्रसिद्धीचीच चटक लागते. तेव्हां त्यांचा कल पडद्याआड राहून प्रामाणिकपणें यथाशक्ति काम करण्याकडे आहे. श्रीछत्रपति शिवाजी सहकारी साखर कारखान्याच्या प्रारंभीच्या वैचारिक अवस्थेपासून ते त्यांत आहेत. दि. ६।८।१९५५ रोजीं कारखाना रजिस्टर झाला. दि. १७।१।५७ या दिवशीं कारखान्यांतून साखरेचें पहिलें पोतें बाहेर आलें. पहिलें सरकारनियुक्त संचालक मंडळ दि. २४।१।५६ रोजीं प्रकट झालें. या वेळेपासून ते दि. १७।९।६१ पर्यंत ते व्हाइस चेअरमन म्हणून होते. दि. २६।९।६१ रोजीं झालेल्या संचालक मंडळाच्या सभेंत ते चेअरमन म्हणून निवडले गेले. तेव्हांपासून ते चेअरमन पद भूषवीत आहेत. दि. ३०।६।६२ च्या अहवालाप्रमाणें या कारखान्याचे उत्पादक सभासद ८६० आहेत. त्यांचें उसाचें क्षेत्र २३५०·०० एकर आहे. साखरेचा उतारा ११·८० असून सभासदांच्या उसास दिलेला भाव दर टनास रु. ५०·७५ आहे.

सहकारी क्षेत्रांत पडून माणिकराव यांना फार वर्षे झालीं नाहींत. सहकारी तत्त्वप्रणालीवर त्यांची श्रद्धा व निष्ठा आहे. ते म्हणतात 'सहकार मंदिर' मला पूज्य आहे. पण त्यामधील कांहीं पुजाऱ्यांबद्दल मात्र माझा आक्षेप आहे. त्यांचें तर असें मत बनूं लागलें आहे कीं, सहकारी सोसायट्यांना, सभासदांना देण्यासाठी जें कर्ज मध्यवर्ती सहकारी बँकांकडून घ्यावें लागतें तें त्यांना सहकारी साखर कारखान्यांनीं पुरवावें. (निदान

## श्रीछत्रपति शिवाजी सहकारी साखर कारखाना लि.



चेअरमन
श्री. माणिकराव सोपानराव जाचक

काहीं लोकांचा ज्योतिषावर नितांत विश्वास असतो; तर कांहींचा 'म्हटलं तर आहे अन् म्हटलं तर नाहीं' अशा स्वरूपाचा दिसून येतो. या उलट, प्रथम ज्योतिषाबद्दल अविश्वास बाळगणारे, जेव्हां त्यांच्या आयुष्यांत ते नाकारीत असणारी घटना अचूक घडते तेव्हां ते ज्योतिष खरें आहे असें म्हणण्यास तयार होतात. हाच अनुभव "श्रीछत्रपति शिवाजी सहकारी साखरकारखाना, लि. भवानीनगर (सणसर), जि. पुणें." या कारखान्याचे विद्यमान चेअरमन श्री. माणिकराव सोपानराव जाचक यांच्या बाबतींत आला. त्याचें असें झालें—या कारखान्याच्या सरकारनियुक्त पहिल्या संचालक मंडळाची मुदत १९६१ च्या सहकारी वर्षअखेरीस संपत होती. पुढील वर्षासाठी जें संचालक मंडळ कारभार पाहणार होतें तें निवडून यावयाचें होतें. सप्टेंबर १९६१ मध्यें निवडणुका होऊन श्री. माणिकराव त्यांत निवडून आले. चेअरमन होण्याची त्यांची इच्छा नव्हती. पण एका ज्योतिषानें त्यांना निक्षून सांगितलें होतें कीं, यंदा चेअरमनपद तुमचेकडेच येणार. माणिकराव नाहीं म्हणत होते. शेवटीं झालें तसेंच. तेच चेअरमन म्हणून निवडून आले.

कोठल्याहि पदाची अभिलाषा न धरणाऱ्या पण सतत कार्यरत राहणाऱ्या माणिकरावांचा पूर्वेतिहास पाहण्यासारखा आहे. त्यांचे वडील कै. रा. ब. सोपानराव तुकाराम जाचक हे मूळचे इंदापूर तालुक्यांतील निंबोडी या गांवचे. हे सहा बंधू. पैकी सोपानरावांचा क्रमांक तिसरा, निंबोडीहून निघून ते बारामती-जवळील मोतीबाग या वस्तीवर राहावयास व उद्योगासाठी आले. पूर्वीची आपली एक म्हण आहे, 'न मिळे भीक तर मास्तरकी शीक', सोपानराव खरोखरच तेथें एक 'गांवठी' शाळा काढून मास्तर झाले, आणि तेव्हांपासून रावबहादूर होईपर्यंत ते मास्तर म्हणून ओळखले जाऊं लागले. पुढें ते शेतींत पडले. उद्योगशीलतेनें आणि चिकाटीनें ते यथाकाल एक बडे बागायतदार झाले. उत्कर्षाचा सोपान झरझर चढून जाण्यास सोपानरावांना दैवानेंहि चांगलाच हात दिला. समाजांत, सरकारांत, त्यांनीं प्रतिष्ठा प्राप्त करून घेऊन स्वतःचें आणि स्वतःच्या कुळाचें नांव संस्मरणीय करून ठेविलें. रावबहादुरांचे थोरले चिरंजीव श्री. माणिकराव. ते वडिलांप्रमाणेंच कर्तव्यरत आणि कष्टाळू कृषिवल आहेत. त्यांचा जन्म दि. २३।११।२५ रोजीं झाला. मर्दानी खेळाची आणि व्यायामाची त्यांना फार आवड. व्यायामाचे ओढीनें ते बडोदें येथें जाऊन प्रो. माणिकराव यांच्या जुम्मादादा व्यायामशाळेंत त्यांनीं कुस्ती, लाठी–काठी यांचें शिक्षण घेतलें. त्यांची शरीरयष्टि मजबूत आणि चपळ असण्याचें कारण त्यांची व्यायामविषयक आवड हें होय. पुढें १९४४ सालीं ते शेतीच्या धंद्यांत पडले. शेतीची त्यांची आवड वडिलार्जित कीं स्वाभाविक हें ठरविणें सुलभ नाहीं. शेती ते 'बाबा वाक्यं प्रमाणम्' किंवा चालू चाकोरींतून करीत नाहींत. शेती करण्याची त्यांची पद्धति स्वतंत्र आणि स्वानुभवसिद्ध आहे. शेती हा धंदा आहे असें समजून ते करतात. शेतीबद्दलचें त्यांचें अर्थशास्त्र आहे. थोडक्यांत म्हणजे ते एक प्रयोगशील आणि प्रगत शेतकरी आहेत. एकदां त्यांनीं रताळ्याचें पीक घेतलें. त्याचें एकरी उत्पन्न ४०० मण आणून दाखविलें. हाच मामला उसाच्या बाबतींतहि. आतां त्यांचें लक्ष उसाच्या तुऱ्यावरून द्राक्षाच्या वेलांकडे वळलें आहे. प्रत्येक पिकाची त्यांना सशास्त्र माहिती आहे. त्यांना जनावरांचा फार षोक आहे. त्यांच्या गोठ्यांत खिलार बैलांजवळ रेड सिंधी गाई आणि ऑस्ट्रेलिअन ब्रीडच्या शेळ्या आणि बोकड बांधलेले दिसतात. त्यांना प्रसिद्धीचें वावडें असून चहा वर्ज्य आहे. त्यांचें एक वैशिष्ट्य म्हणजे ते उत्कृष्ट अश्वपरीक्षक आहेत. घोड्याच्या अंगच्या खोडी आणि अशुभसूचक गोष्टी ते एक प्रकारच्या अंतर्ज्ञानानें अचूक हेरतात ! या भागांतील घोडे खरेदी करणारांचे ते सल्लागार आहेत.

सार्वजनिक कामाची त्यांना आवड आहे, पण आसक्ति नाहीं. ते म्हणतात कीं आसक्ति असली कीं माणूस अपरिहार्यपणें स्वतःचा गाजावाजा करून घेण्याच्या बेहोषींत सांपडून खरें कार्य करण्यापासून दुरावतो. त्याला फक्त प्रसिद्धीचीच चटक लागते. तेव्हां त्यांचा कल पडद्याआड राहून प्रामाणिकपणें यथाशक्ति काम करण्याकडे आहे. श्रीछत्रपति शिवाजी सहकारी साखर कारखान्याच्या प्रारंभीच्या वैचारिक अवस्थेपासून ते त्यांत आहेत. दि. ६।८।१९५५ रोजीं कारखाना रजिस्टर झाला. दि. १७।१।५७ या दिवशीं कारखान्यांतून साखरेचें पहिलें पोतें बाहेर आलें. पहिलें सरकारनियुक्त संचालक मंडळ दि. २४।१।५६ रोजीं प्रकट झालें. या वेळेपासून ते दि. १७।९।६१ पर्यंत ते व्हाइस चेअरमन म्हणून होते. दि. २६।९।६१ रोजीं झालेल्या संचालक मंडळाच्या सभेंत ते चेअरमन म्हणून निवडले गेले. तेव्हांपासून ते चेअरमन पद भूषवीत आहेत. दि. ३०।६।६२ च्या अहवालाप्रमाणें या कारखान्याचे उत्पादक सभासद ८६० आहेत. त्यांचें उसाचें क्षेत्र २३५०·०० एकर आहे. साखरेचा उतारा ११·८० असून सभासदांच्या उसास दिलेला भाव दर टनास रु. ५०·७५ आहे.

सहकारी क्षेत्रांत पडून माणिकराव यांना फार वर्षें झालीं नाहींत. सहकारी तत्त्वप्रणालीवर त्यांची श्रद्धा व निष्ठा आहे. ते म्हणतात 'सहकार मंदिर' मला पूज्य आहे. पण त्यामधील कांहीं पुजाऱ्यांबद्दल मात्र माझा आक्षेप आहे. त्यांचें तर असें मत बनूं लागलें आहे कीं, सहकारी सोसायट्यांना, सभासदांना देण्यासाठी जें कर्ज मध्यवर्ती सहकारी बँकांकडून घ्यावें लागतें तें त्यांना सहकारी साखर कारखान्यांनीं पुरवावें. ( निदान

कारखान्यांच्या कार्यक्षेत्रांतील सहकारी सोसायट्यांना तरी पुरवावें). कारण मध्यवर्ती सहकारी बँकांकडून सोसायट्यांच्या सभासदांना जें कर्ज मिळतें तें त्यांना पदरांत पाडून घेण्यासाठी जी 'पदरमोड' करावी लागते ती तरी वरील बदलानें वाचेल असें त्यांचें मत आहे.

या कारखान्याचे संचालक मंडळ—सभांस उपस्थित राहण्यासाठी भत्ता ते घेत नाहींत. सर्व कारभार सभासदांच्या आर्थिक उत्कर्षावर लक्ष ठेवून चालविला जातो. या कारखान्याच्या उभारणींत अनेकांच्या बरोबर जाचक बंधूंचे कष्ट खर्ची पडले आहेत. श्री. माणिकराव यांची कारकीर्द कारखान्याचें पाऊल पुढचा टप्पा गांठील यांत संशय नाहीं. आपल्या सध्यांच्या उज्ज्वल यशाचें श्रेय ते विनयानें व कृतज्ञतेनें आपल्या वडिलांच्या शिकवणीस आणि आशीर्वादास देतात.

## मध्यप्रदेशांत अल्युमिनमचा कारखाना

हंगेरिअन सरकारच्या मदतीनें मध्यप्रदेशांत एक अल्युमिनमचा कारखाना काढण्याचें घाटत आहे. ह्या कारखान्यासाठी ५० कोटी रुपये भांडवल लागणार असून त्यांपैकी कांहीं हंगेरी स्वतःच पुरविणार आहे. हंगेरीकडून तांत्रिक सल्ला अर्थातच मिळणार आहे. मध्य प्रदेशांतील ज्या भागांत अल्युमिनमचें खनिज सांपडतें त्या भागाची पहाणी हंगेरीच्या तज्ज्ञांनीं नुकतीच पुरी केली आहे. कारखान्याची उभारणी होऊन प्रत्यक्ष उत्पादनास आरंभ होण्यास चौथा पंचवार्षिक कार्यक्रम उजाडावा लागेल. परंतु औद्योगिक मालाबाबत शक्य तितकें लवकर स्वयंपूर्ण होण्याची कोशीस आतांपासूनच करण्यांत येत आहे.

## प्रेसिडेंट केनेडी ह्यांचा इशारा

अमेरिकेच्या मजूर खात्याने केलेल्या एका खास अहवालासंबंधीं मत व्यक्त करतांना प्रे. केनेडी ह्यांनीं असा इशारा दिला आहे कीं अमेरिकेपुढील अनेक आर्थिक प्रश्नांत बेकारीच्या प्रश्नाला पहिल्या क्रमांकाचें महत्त्व यावें लागेल. अमेरिकेची उत्पादनक्षमता आणि अर्थव्यवस्था अधिक कार्यक्षम झालेली असली तरी वाढल्या लोकसंख्येमुळें दरसाल अधिकाधिक लोक रोजगार मिळविण्यासाठी पुढें येत आहेत. सध्यांच अशी स्थिति आहे कीं काम करण्यास पात्र अशा लोकांपैकी ·७ टक्के लोकांना बेकार राहावें लागत आहे. अमेरिकेंत ३२ लाख लोक दारिद्र्यांत जीवन कंठीत आहेत. ही परिस्थिति अशीच चालू देणें अमेरिकेस परवडणारें नाहीं.

## वेगवेगळ्या राज्यांतील साखरेचें उत्पादन व खप

( आकडे हजार टनांचे )

| राज्य | १९५२-५३ उत्पादन | १९५२-५३ खप | १९६०-६१ उत्पादन | १९६०-६१ खप |
|---|---|---|---|---|
| आंध्र | ८४ | ४८ | १८० | ९५ |
| बिहार | २७३ | १०३ | ३७९ | १४२ |
| महाराष्ट्र आणि गुजरात | १३९ | ३७५ | ५४२ | ५५८ |
| केरळ | ४ | ३१ | १० | ६७ |
| मध्यप्रदेश | ७ | ९० | ३५ | १३८ |
| मद्रास | २८ | ९२ | १२९ | १२६ |
| म्हैसूर | ३७ | ८२ | ११८ | ९० |
| पंजाब | ३१ | १४० | १२१ | १४६ |
| राजस्तान | ६ | ५९ | १८ | ६१ |
| उत्तर प्रदेश | ७०० | २८१ | १४०४ | २४३ |
| भारत | १३१९ | १६५३ | २९८० | २०९३ |

## कोळशाच्या वहातुकीसाठीं बोटी

कलकत्ता बंदरांत कोळशाची वहातूक करण्यासाठी भारत सरकारनें १२ बोटी मिळविण्याचें ठरविलें आहे. ह्या बोटी कोळशाची वहातूक करण्यासाठी खास बनविण्यांत यावयाच्या आहेत. कांहीं बोटी भारतांत कलकत्ता व विशाखापट्टम् येथील कारखान्यांतून बांधण्यांत येणार असून कांहीं बेल्जम व युगोस्लाव्हिआकडून बांधवून घेण्यांत येणार आहेत. कोळशाची किनारी वहातूक करण्यासाठी कशा प्रकारच्या बोटी पाहिजेत. ह्यासंबंधीं शिफारशी करण्यासाठीं सरकारनें एक कमिटी नेमली होती. कमिटीच्या शिफारशींस अनुसरून बोटी बांधण्यांत येणार आहेत.

## हिंदी तंत्रज्ञांची मागणी

लिबियाच्या सरकारने विकासाचा पंचवार्षिक कार्यक्रम आंखला असून त्याच्या अंमलबजावणीस लवकरच प्रारंभ करण्यांत येणार आहे. विकासकार्यांत मार्गदर्शन करण्यासाठी भारत सरकारनें कांहीं तंत्रज्ञ पुरवावे अशी मागणी लिबियाच्या सरकारनें केली आहे. लिबियांतील दोन विद्यापीठांतून शिकविण्याचें काम करण्यासाठीं कांहीं शिक्षक धाडण्याची विनंतीहि भारत सरकारकडे करण्यांत आली आहे. सध्यां लिबियांतील त्रिपोली येथें एक आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत आले आहे. ह्या प्रदर्शनांत भारतानें आपला गाळा उघडला आहेत. इतर कांहीं देशांनीं मांडलेल्या वस्तूंच्या मानानें भारतानें अधिक वस्तु ठेवलेल्या आहेत तरीसुद्धां भारताच्या औद्योगिक प्रगतीची कल्पना देण्याइतक्या वस्तू प्रदर्शनांत मांडण्यांत आलेल्या नाहींत.

## उत्तर प्रदेशांतील साखरेचें उत्पादन घटलें

इंडियन शुगर मिल्स असोसिएशनच्या उत्तरप्रदेशांतील शाखेच्या ८ व्या वार्षिक अधिवेशनाचें उद्घाटन राज्याचे मुख्य मंत्री श्री. गुप्ता यांनीं केलें. ह्या प्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले कीं उत्तरप्रदेशांतील साखरेचा धंदा सध्यां संकटांत सापडला आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेंत ह्या धंद्याला महत्त्वाचें स्थान असल्यानें संकटांतून मार्ग काढणें जरूर आहे. म्हणून राज्यांतील साखर कारखानदार, उसाचे शेतकरी आणि मजूर ह्यांनीं आपआपल्या परीनें झटलें पाहिजे. साखरेच्या धंद्यांत राज्यांतील २० लाख शेतकरी व मजूर गुंतलेले आहेत. १९५२–५३ सालीं भारतामधील साखरेच्या एकूण उत्पादनापैकी ६० टक्के साखर उत्तरप्रदेशांत निर्माण करण्यांत आली होती. १९६१–६२ मध्यें हें प्रमाण ४५ टक्क्यापर्यंत खालीं आलेलें आहे. साखरेचें दर एकरी उत्पादन वाढवून आणि अधिक शर्करा असलेला ऊंस लावून उत्पादन पुन्हा वाढविलें पाहिजे.

## नव्या रोजगाराची निर्मिति

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १·४ कोटी नव्या नौकरांची निर्मिति करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. परंतु कार्यक्रमाच्या पहिल्या दोन वर्षांत फक्त ४० लाख नव्या नौकऱ्या उपलब्ध झाल्या आहेत. नौकऱ्यांच्या संख्येंत झालेली ही वाढ अपेक्षेपेक्षा बरीच कमी आहे. तथापि ह्या बाबतींतील तज्ज्ञांच्या मतानें देशांतील आणीबाणीच्या परिस्थितीमुळें कार्यक्रमाच्या उरलेल्या वेळांत उद्दिष्ट गांठलें जाईल. लष्करांत नव्यानें करण्यांत येणारी भरती आणि संरक्षणविषयक उत्पादनांत करण्यांत येणारी वाढ ह्यांच्यामुळें नौकऱ्या निर्माण होण्यास बरीच मदत होणार आहे.

## सुरक्षिततेच्या सर्व मर्यादा सांभाळण्यांत महाराष्ट्र बँक अग्रेसर

### अध्यक्ष, श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांचें अध्यक्षीय भाषण

अहवालाच्या वर्षी आपलें भाग–भांडवल ४० लक्ष रुपयांवरून ५० लक्ष रुपयांपर्यंत वाढविण्यांत आलें. आपली एकूण गंगाजळी आतां रु. २६·८० लक्ष इतकी झाली असून तिचें वसूल भांडवलाशीं प्रमाण ५३·८७ टक्के पडतें. भाग भांडवलावर रास्त लाभांश देऊन बँकेची आर्थिक स्थिति जास्तींत जास्त भक्कम करण्याच्या संचालकांच्या नेहमींच्या धोरणाशीं आपण सहमत व्हाल अशी मला खात्री वाटते.

अहवालाच्या वर्षी आपल्या ठेवी १९ कोटी, ४८ लक्ष रुपयांपासून रु. २४ कोटी, ७६ लक्षांपर्यंत वाढल्या आहेत. ही वाढ १९६१ च्या ठेवींच्या २७·११ टक्के होते. एकूण शिड्यूल्ड बँकांच्या बाबतींत झालेली १२ टक्के वाढ लक्षांत घेतां आपल्या बँकेचें या बाबतींतील प्रमाण समाधानकारक वाटेल, असा मला विश्वास आहे. जिंदगीचे बाजूकडे पाहतां आपल्या गुंतवणुकीच्या तरतेपणाचें प्रमाण गतवर्षीपेक्षांहि वाढल्याचें निदर्शनास येईल. आपलें गुंतवणुकीचें ठेवींशीं असणारें प्रमाण ३८·३६ टक्के इतकें पडतें; तर रोकड व बँकांकडील शिल्लक यांचें प्रमाण १७·२३ टक्के इतकें पडतें. म्हणजे रिझर्व्ह बँकेच्या सूचनेप्रमाणें ठेवाव्या लागणाऱ्या तरतेपणाचें प्रमाणापेक्षाहि हें प्रमाण कितीतरी अधिक आहे. कर्जाऊ दिलेल्या रकमा गतसालीं रु. ९ कोटी, ७६ लक्ष होत्या. त्या यंदा रु. ११ कोटी, ८६ लक्ष इतक्या वाढल्या आहेत. म्हणजे २ कोटींचे वर वाढ झालेली आहे. कर्जे देण्याच्या बाबतींत त्यांचे ठेवीशीं ४७·७८ टक्के इतकें प्रमाण पडतें. एकूण शिड्यूल्ड बँकांचें हेंच प्रमाण ६९·८२ टक्के आहे. महाराष्ट्रांतील लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याचें आपलें धोरण संचालक मंडळानें चालूं ठेवलें आहे. रिझर्व्ह बँकेनें उद्योगधंद्यांना दिलेल्या कर्जाच्या बाबतींत बँकांस हमी देण्याची योजना कार्यवाहींत आल्यामुळें अशा प्रकारच्या कर्जाचें प्रमाण वाढलें आहे. कर्जे देतांना महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत व विशेषत: मराठवाडा, विदर्भ व कोंकण या औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या विभागांत समतोलपणा राखला जात आहे, यांकडे बँक विशेष लक्ष देतें. बँकेनें अशा अधिकांत अधिक लहान उद्योगधंद्यांना मदत करण्याचा नेहमींच प्रयत्न केला आहे. स्टेट एड टू इंडस्ट्रिज ॲक्टप्रमाणें कर्जे धावयास पात्र असणाऱ्या बँकांच्या यादींत महाराष्ट्र सरकारनें आपल्या बँकेचें नांव समाविष्ट केलें आहे. त्यामुळें या खात्याचें काम दिवसेंदिवस वाढत आहे. महाराष्ट्रांत अनेक नवनवीन उद्योगधंदे निघत आहेत व बँक त्यांस, ठेवीदारांचें योग्य तें हितसंरक्षण करून, आपल्या परीनें अधिकाधिक मदत करीत आहे. आपल्या विदेश विनिमय खात्याचे व्यवहारहि प्रतिसाल वाढत असून त्यांत समाधानकारक प्रगति होत आहे, हें सांगण्यास मला आनंद वाटतो.

रिझर्व्ह बँकेच्या सूचनेवरून व त्यांच्या विचाराकरितां आम्ही यापुढील तीन ते पांच वर्षांत उघडावयाच्या संकल्पित शाखांची यादी रिझर्व्ह बँकेकडे पाठविली आहे. शाखावाढीचा हा कार्यक्रम अंमलांत आणण्याच्या दृष्टीनें अधिकारी वर्गास आवश्यक तें शिक्षण देण्याची योजना यापूर्वीच सुरू केली आहे. तसेंच रिजनल प्रॉडक्टिव्हिटी कौन्सिल व मॅनेजमेंट असोसिएशन यांच्या शैक्षणिक कार्यक्रमांस बँकेचे कांहीं अधिकारी वेळोवेळीं पाठविले जातात. अशा तऱ्हेनें संकल्पित शाखावाढीच्या कार्यक्रमासाठी आवश्यक तो अधिकारी वर्ग योग्य तें शिक्षण देऊन तयार केला जातो.

बँकेचा नोकरवर्ग, ठेवीदार, इतर ग्राहक व भागधारक या सर्वांचे मी संस्थेवरील वाढत्या प्रेमाबद्दल व सहकार्याबद्दल कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. शाखांच्या सल्लागार समित्यांचे सभासद व संचालक मंडळावरील माझे सहकारी यांचेहि मी अत्यंत कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. त्यांच्या सहकार्यामुळें व मार्गदर्शनामुळें माझें कार्य सुकर व सुखद झालें आहे. शेवटीं बँकेच्या सर्व थरांतील अधिकारी वर्गाचे व विशेषत: आपले प्रेमळ व शांत स्वभावाचे जनरल मॅनेजर श्री. जोग यांचे आभार मानणें हें मी माझें कर्तव्य समजतों. या सर्वांनीं या वाढत्या संस्थेची जबाबदारी आनंदानें व हौसेनें शिरावर घेऊन ती सर्व प्रकारच्या परिस्थितींतून पार पाडली आहे.

**चिनी नागरिकांची अखेरची इच्छा** — हॉंगकॉंगमधील एका दफन गृहांत ८,००० चिनी नागरिकांचे देह शवपेटिकांत ठेवण्यांत आले आहेत. परदेशाला गेलेल्या ह्या नागरिकांनीं आपले देह मरणोत्तर मातृभूमींत पुरण्यांत यावेत अशी इच्छा व्यक्त केली होती. परंतु चीनच्या कम्युनिस्ट सरकारनें शेतीसाठी अधिक जमीन मिळावी म्हणून दफनाच्या सर्व जागा उध्वस्त केल्या आहेत.

## The Bank of Karad Limited, Karad.

Notice is hereby given that the Seventeenth Annual General Meeting of Share-holders of the Bank of Karad Limited, will be held at the Registered Office of the Bank at 15 Raviwar Peth, Karad on Wednesday the 24th April 1963 at 4 p. m. to receive and consider the Balance Sheet, Profit and Loss Account and Reports of the Directors and of Auditors, to declare dividend, to elect Directors and to appoint auditors etc., as per notice sent to shareholders.

**M. V. Khandkar,**

30th March, 1963. Manager.

*N. B.* :—(1) A Member entitled to attend and vote is entitled to appoint a proxy to attend and vote instead of himself and the proxy need not be a member.

(2) The Share Transfer Books of the Company will be closed from the 9th April 1963 to 26th April 1963 (both days inclusive).

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### पोरबंदर बंदराचा विकास

सौराष्ट्रामधील पोरबंदर बंदराचा विकास करून तें बाराहि महिने उपयोगांत येईल असें करण्यांत येणार आहे. बंदराच्या भागांत सिमेंटचे व सोड्याचे कारखाने काढण्यांत आल्यापासून बंदरांतील वाहतूक वाढत चालली आहे. ए. सी. सी. कंपनी बंदराजवळ आणखी एक सिमेंटचा कारखाना काढीत आहे. उद्योगधंद्यांत होणाऱ्या ह्या वृद्धीमुळें बंदरांतील ने-आण आणखीच वाढणार आहे.

### कापसाच्या लागवडींत वाढ

नगर जिल्ह्यांतील श्रीरामपूर, कोपरगांव आणि राहुरी तालुक्यांतील शेतकऱ्यांनीं कापसाच्या लागवडीचें क्षेत्र झपाट्यानें वाढविण्याचें ठरविलें आहे. जिल्ह्यांत या वर्षी १ लाख एकर जमिनींत 'देवीराज' जातीच्या कापसाची लागवड करण्यांत येणार आहे. ह्या नव्या लागवडीमुळें एकट्या नगर जिल्ह्यांतच ६ कोटी रुपये किंमतीचा लांब धाग्याचा कापूस पैदा होईल अशी अपेक्षा आहे.

### पूना अर्बन को. बँकस् असोसिएशन

पूना अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकस् असोसिएशनची सभा दि. २१।३।६३ रोजीं होऊन श्री. डी. डी. चितळे अध्यक्ष, श्री र. पां. भोंडे वकील, उपाध्यक्ष व श्री. भ. ग. साबणे चिटणीस अशी निवड झाली. त्याचप्रमाणें सांगली येथें लवकरच अर्बन बँकांची परिषद् होणार आहे. त्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा झाली व सूचना करण्याचें ठरलें.

### भारतीय भाषांचा वाढता अभ्यास

रशिआंतील भाषापंडित भारतीय संस्कृतीचा व भारतामधील भाषांचा अधिकाधिक अभ्यास करीत आहेत. रशियन विद्यार्थ्यांना भारतीय भाषा शिकण्यास सोपें जावें म्हणून ह्या भाषांची संपूर्ण व्याकरणेंही तयार करण्यांत येत आहेत. एका रशिअन भाषाकोविदानें ७ वर्षेपर्यंत तामीळ भाषेचा अभ्यास चालविला आहे व आता तो तामीळ भाषेचें व्याकरण लिहिण्यांत मग्न आहे. तामीळ भाषेप्रमाणेंच बंगाली व हिंदी भाषेची व्याकरणेही तयार करण्यात येत आहेत. रशिअन विद्वान भारतामधील राजकीय विचार, शेतीच्या अर्थव्यवस्था, दंतकथा, असल्या विषयांचाही अभ्यास करीत आहेत.

### परदेशीय चलनाच्या बचतीचा हट्ट

नागासाकी येथील जपानच्या बोटबांधणीच्या कारखान्यांत जयंती शिपिंग कॉर्पोरेशनसाठी १०,००० टन वजनाची 'गौतम जयंती' नांवाची बोट बांधण्यांत आली आहे. ही बोट आणण्यासाठी ४५ हिंदी खलाशांना जपानला न्यावयाचें होतें. खलाशांना एका परदेशीय विमान कंपनीच्या विमानांतून पाठविण्यांत येणार होतें. परंतु खलाशांना ही गोष्ट आवडली नाहीं. परदेशीय विमान कंपनीच्या विमानानें प्रवास केल्यास परदेशीय चलनाचा निष्कारण खर्च होईल म्हणून आपणांस हिंदी कंपनीच्या विमानानें धाडण्यांत यावें असा आग्रह त्यांनीं धरला. आतां त्यांना हिंदी कंपनीच्या विमानानें पोंचविण्यांत येईल.


**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२९००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३। " |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | " ५ " |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधी चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :—३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई २.




**बेडेकर**

**मसाले, लोणचीं व पापड**

आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.

वापरून पाहा.

मुगभाट, मुंबई ४.

शाखाः ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ६१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.